MHYA150011362025

| | | |
|---|---|---|
| **दाखल तारीख** | : | ११.१२.२०२५ |
| **नोंदणी तारीख** | : | ११.१२.२०२५ |
| **निकाल तारीख** | : | २२.०७.२०२६ |
| **कालावधी** | : | ०० व.,०७ म.,११दि. |

## प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, नेर, ता. नेर, जि. यवतमाळ यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी : जी. सी. फुलझळके)

**नियमित फौजदारी खटला क्र.१५१/२०२५** **निशाणी क्र.२८/ब**

| | |
|---|---|
| प्रथम खबर क्रमांक | ५३७/२०२५ |
| अहवाल/गुन्हयाचा तपशील व पोलीस ठाणे | नेर पोलीस ठाणे,<br>ता. नेर, जि. यवतमाळ. |
| निकालाचा दिनांक | २२.०७.२०२६. |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र सरकारतर्फे, नेर पोलीस ठाणे. |
| अभियोगपक्षातर्फे वकील | श्री. एस. एन. वानखडे,<br>सहाय्यक सरकारी अभियोक्ता. |
| आरोपी | **१. राम नारायणराव नाल्हे,**<br>वय – २६ वर्षे, व्यवसाय– मजुरी,<br>**२. नारायण गुलाबराव नाल्हे,**<br>वय – ५६ वर्षे, व्यवसाय– मजुरी,<br>**३. सौ. वंदना उर्फ कल्पना नारायण नाल्हे,**<br>वय – ५० वर्षे, व्यवसाय– मजुरी,<br>**४. हनुमंता नारायण नाल्हे,** |

| | |
|---|---|
| | वय – २४ वर्षे, व्यवसाय– मजुरी,<br>**५. सौ. किरण महेश दुर्ग,**<br>वय – २२ वर्षे, व्यवसाय– गृहीणी,<br>सर्व राहणार – मांगलादेवी,<br>ता. नेर, जि. यवतमाळ. |
| आरोपींतर्फे वकील | श्री. खालीद. |

**भाग 'ब'**

**[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ४, परिच्छेद ४४ (ii)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २९.११.२०२४ ते १४.०६.२०२५. |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | ०१.१०.२०२५. |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ११.१२.२०२५. |
| दोषारोप नोंदविल्याची तारीख | ०७.०३.२०२६. |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०७.०३.२०२६. |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | लागु नाही. |
| न्यायनिर्णय घोषित तारीख | २२.०७.२०२६. |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख | लागु नाही. |

मा. उच्च न्यायालाच्या दिनांक १४.०७.२०२२ रोजीच्या राजपत्राच्या

अधिसुचना क्र. ०८०१/२०२२ नुसार

**आरोपींचा तपशील**

| आर ो | आरोपीचे नाव | अटक केल्या | जामीना वर | आरोप केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता | सुनावण् यात | संपरिक्षेदर म्यान |
|---|---|---|---|---|---|---|---|

| पी क्र. | | चा दिनांक | सोडल्य ा चा दिनांक | | किंवा दोषी | आलेली शिक्षा | आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राम नारायणराव नाल्हे | .... | .... | भा.न्या. सं. क. ८५, ३५१ (२)(३), ३५२ सह कलम ३(५) | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |
| २. | नारायण गुलाबराव नाल्हे | .... | .... | भा.न्या. सं. क. ८५, ३५१ (२)(३), ३५२ सह कलम ३(५) | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |
| ३. | सौ. वंदना उर्फ कल्पना नारायण नाल्हे | .... | .... | भा.न्या. सं. क. ८५, ३५१ (२)(३), ३५२ सह कलम ३(५) | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |
| ४. | हनुमंता नारायण नाल्हे | .... | .... | भा.न्या. सं. क. ८५, ३५१ (२)(३), ३५२ सह कलम ३(५) | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |
| ५. | सौ. किरण महेश दुर्ग | .... | .... | भा.न्या. सं. क. ८५, ३५१ (२)(३), ३५२ सह कलम ३(५) | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |

# न्या य नि र्ण य
## (दिनांक माहे २२ जुलै २०२६ रोजी पारीत)

आरोपींविरुध्द निश्चित करण्यात आलेल्या भारतीय न्याय संहिताचे कलम ८५, ३५१ (२)(३), ३५२ सह कलम ३(५) अन्वये खालील दोषारोप सिध्दतेकरीता प्रस्तुत संपरीक्षा आहे.

**अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :–**

२. आरोपी क्र.१ हा तक्रारदार यांचा पती असुन आरोपी क्र.२ ते ५ त्यांच्या पतीचे नातेवाईक आहेत. तक्रारदार यांचा विवाह आरोपी क्र.१ सोबत दिनांक २९.११.२०२४ रोजी अमरावती येथील आर्य समाज मंदिरात पार पडले. तक्रारदार आरोपींसोबत एकत्र कुटुंबात राहत होते. लग्नानंतर आरोपी क्र.१ हा आई–वडीलांकडुन दोन लाख रुपये आणण्यासाठी म्हणत होते व त्यांच्याकडे पैशाची मागणी करीत होते. आरोपी क्र.२ व ३ हे तक्रारदार यांना पैशांसाठी तगादा लावत होते व मानसिक त्रास देत होते. तक्रारदार यांच्या वडीलांनी आरोपी क्र.१ यांना मार्च २०२५ मध्ये पन्नास हजार रुपये दिले होते. तक्रारदार यांना आरोपींनी शारिरीक व मानसिक त्रास दिल्यामुळे तक्रारदार यांनी नेर पोलीस ठाणे येथे तक्रार दिली. सदरच्या तक्रारीवरुन आरोपींविरुध्द गुन्हा क्रमांक ५३७/२०२५ हा भारतीय न्याय संहिताचे कलम ८५, ३५१ (२)(३), ३५२ सह कलम ३(५) अन्वये नोंदविण्यात आला.

३. पोलीसांनी तपासादरम्यान पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केले. तक्रारदार व इतर साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपींविरुध्द

सबळ पुरावा आढळुन आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

४. आरोपींविरुध्द निशाणी क्र.२१ वर भारतीय न्याय संहिताचे कलम ८५, ३५१ (२)(३), ३५२ सह कलम ३(५) अन्वये दोषारोप निश्चित केले. निश्चित केलेले दोषारोप आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचून दाखविले व समजुन सांगितले. आरोपींनी निश्चित केलेले दोषारोप अमान्य केले व संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोगपक्ष –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | रेशमा राम नाल्हे – साक्षीदार क्र.१. | तक्रारदार. |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार असल्यास –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाण्यांची यादी

अ. **अभियोगपक्ष –**

| अनु. क्र. | स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | तक्रारीवरील सही | २५. |
| २. | छापील प्रथम खबरी अहवालावरील सही | २६. |

ब. **बचाव पक्ष –**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क. **न्यायालयीन निशाणी –**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ड. **मुद्देमाल –**

| अनु. क्र. | मुद्देमालाचे वर्णन | निशाणी/आर्टिकल |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

५. साक्षीदारांच्या पुराव्यातून आरोपींच्या विरोधात जाणारा पुरावा आढळुन न आल्याने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ३५१ प्रमाणे आरोपींचे निवेदन नोंदविण्यात आले नाही. संपरीक्षेदरम्यान अभियोगपक्षाने तक्रारदार यांना

तपासले. अभियोगपक्षातर्फे विद्वान सरकारी वकील श्री. एस. एन. वानखडे व आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. खालीद यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील पुरावा तसेच, दोन्ही बाजुंचा युक्तीवाद लक्षात घेता, पुढील मुद्दे माझ्या विचाराधीन आले, त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसहित पुढील प्रमाणे नमुद केले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक २९.११.२०२४ ते दिनांक १४.०६.२०२५ रोजी पर्यंत आरोपी क्र.१ पती, आरोपी क्र. २ ते ५ नातेवाईक यांनी आपसी संगणमत करुन तक्रारदार यांचा मानसिक व शारिरीक छळ केला व त्याद्वारे भारतीय न्याय संहिताचे कलम ८५ सह कलम ३(५) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला काय ? | **<u>नाही.</u>** |
| २. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन तक्रारदाराच्या मनात भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारीपात्र धाकदपटशा दाखविले आणि भारतीय न्याय संहिता कलम ३५१(२)(३) सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला ? | **<u>नाही.</u>** |
| ३. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन तक्रारदार यांचेकडुन शांततेचा भंग व्हावा म्हणुन त्यांना जाणीवपुर्वक | |

| | | |
|---|---|---|
| | अपमानित करुन शिवीगाळ केली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय न्याय संहिताचे कलम ३५२ सह कलम ३(५) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला काय ? | **नाही.** |
| ४. | अंतिम आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ बाबत :–**

६. वरील तिन्ही मुद्दे एकाच घटनेशी निगडीत आहेत. पुरावा तसेच विवेचनांची पुनरावृत्ती टाळणेकरिता वरील मुद्दयांची कारणमीमांसा एकत्रितरित्या करणे सोयीचे व ईष्ट होईल.

७. अभियोगपक्षातर्फे तक्रारदार साक्षीदार क्र.१ रेशमा राम नाल्हे यांना निशाणी क्र.२४ वर तपासण्यात आले. तक्रारदार यांनी सरतपासात नमुद केले की, आरोपी क्र.१ त्यांचे पती आहेत, इतर आरोपी हे त्यांचे नातेवाईक आहे. सन २०२४ साली त्यांचा विवाह आरोपी क्र.१ यांच्यासोबत आर्य समाज अमरावती येथे झाला होता. लग्न झाल्यानंतर त्या सासरी नांदण्यासाठी आल्या होत्या. आरोपींसोबत त्यांची बोलचाल झाली होती. याव्यतिरिक्त काही घडले नसल्याचे त्यांनी नमुद केले. तक्रारदार यांनी तक्रारीवर त्यांची सही असल्याचे व तक्रारीतील मजकुर त्यांना माहित नसल्याचे नमुद केले. तक्रारदार यांनी अभियोगपक्षाला कोणतेही सहकार्य केले नसल्यामुळे अभियोगपक्षातर्फे तक्रारदार यांचा उलटतपास घेण्यात आला. अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात तक्रारदार यांनी नमुद केले की,

आरोपी व त्यांच्यात आपसी समजोता झाला आहे. आरोपींनी त्यांना शारिरीक व मानसिक त्रास दिल्याचे, शिवीगाळ केल्याचे व जिवे मारण्याची धमकी दिल्याचे त्यांनी नाकारले. अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात अभियोगपक्षास पुरक असा कोणताही पुरावा उपलब्ध होवु शकला नाही. तक्रारदार यांनी पुरसिस दाखल केली. सदर पुरससिमध्ये त्यांनी नमुद केले की, त्यांच्यात आपसी समजोता झाला आहे. त्यांना प्रकरण पुढे चालवायचे नाही.

८. अभियोग पक्षातर्फे तक्रारदार या महत्वाच्या साक्षीदारांचा पुरावा नोंदविण्यात आला. सदर महत्वाचे साक्षीदार यांनी अभियोगपक्षास समर्थन दर्शविले नसल्यामुळे अभिलेखावर आरोपींविरुध्द कोणताही पुरावा सादर होऊ शकला नाही. म्हणुन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१ अन्वये आरोपींचे बयाण न नोंदविण्याचा आदेश निशाणी क्र.१ वर पारीत करण्यात आला. आरोपींनी त्यांच्या बाजुने कोणीही साक्षीदार तपासले नाही.

९. येथे ही बाब करणे महत्वाची आहे की, अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या वरील महत्वाचे साक्षीदार तक्रारदार यांनी अभियोग पक्षास कोणतेही समर्थन दर्शविले नाही. प्रस्तुत प्रकरणातील तक्रारीतील कथनाच्या अनुशंगाने तक्रारदार यांनी कोणताही पुरावा सादर केला नाही. प्रस्तुतचे प्रकरणामध्ये तक्रारदार यांना स्वतः झालेल्या त्रासाबाबतचे आहे. तक्रारदार स्वतः अभियोग पक्षास कोणतेही समर्थन केलेले नाही. म्हणुन इतर साक्षीदारांना तपासण्यासाठी प्रकरण प्रलंबित ठेवले असले तरी देखील आरोपींविरुध्द दोषारोपीत करण्यात आलेले गुन्हे संपुर्ण संशयापलीकडे सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला असता. बचावपक्षातर्फे घटनास्थळाचा पंचनामा मान्य करण्यात आला. त्याद्वारे घटनास्थळ पंचनाम्याची

कारवाई करण्यात आली होती ही बाब सिध्द होते. मात्र आरोपीने तक्रारदार यांचा शारिरीक व मानसिक त्रास दिला, शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली ही बाब सादर करण्यात आलेल्या पुराव्यावरुन सिध्द होत नाही.

१०. तात्पर्य असे की, दस्तुरखुद तक्रारदार यांनी अभियोग पक्षास कोणतेही समर्थन न दिल्यामुळे आरोपींविरुध्द दोषारोपीत करण्यात आलेले गुन्हे संपुर्ण संशयापलीकडे जावुन सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर 'नकारार्थी' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करीता** :-

११. प्रस्तुत प्रकरणातील तथ्य, अभिलेखावर सादर करण्यात आलेला पुरावा व वरील मुद्दयाचा विविचनोउत्तर निष्कर्ष विचारात घेता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. **आरोपी क्र.१ ते ५** यांना भारतीय न्याय संहिताचे कलम ८५, ३५१ (२) (३), ३५२ सह कलम ३(५) खालील दोषारोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ च्या पुर्ततेसाठी रक्कम रूपये १५,०००/- प्रत्येकी वैयक्तीक जात मुचलका व

जामीन कदबा द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला)

GAJANAN CHANDRAKANT FULZALKE

Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2026.07.22 16:28:14 +0530

नेर, (जी. सी. फुलझळके)

दिनांक : २२.०७.२०२६. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, नेर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same word to word as per the original judgment.

Name of Stenographer :- B. N. Nare (Grade-III)

Court :- Judicial Magistrate F.C., Ner.

Date :- 22.07.2026.

Judgment signed by
the Presiding Officer on :- 22.07.2026.

Judgment uploaded on :- 22.07.2026.